




# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई - प्रशिक्षक

वर्ष २ : अंक ६ / मार्च २०१५



परीक्षा



ग्रंथालयाचा वापर




Accelerated & Mastery Learning

# संपादकीय

सस्नेह नमस्कार,

परीक्षांचा मौसम सुरु आहे. मागच्या सप्ताहात शासनाने परीक्षांबाबत नवी घोषणा केली आहे. १ली ते ८वी या इयत्तांच्या परीक्षाच घेऊ नयेत असा शिक्षण हक्क कायद्यातील मूल्यमापनाचा चुकीचा अर्थ काढला गेला. आकारिक मूल्यमापनाच्या बाबतीत बहुसंख्य शाळांनी विद्यार्थ्यांना भरघोस गुण देऊन टाकणे असा अर्थ लावल्याने शाळांना 'शिक्षणहीन'संस्थांचे रूप आले आहे.त्यावर उपाय म्हणून नैदानिक चाचण्यांचा पर्याय पुढे आला आहे. संकलित मूल्यमापनासाठी घेतल्या जाणाऱ्या वार्षिक परीक्षांच्या प्रश्नपत्रिका काढतानाही अनेक शिक्षक जो गोंधळ घालतात तो पाहता नैदानिक चाचण्या तयार करणे हे अधिकच अवघड असल्याने किती शिक्षकांना ते झेपेल याबद्दल शंकाच आहे.

सुमारे ४० वर्षांपूर्वी घटक चाचणी ही संकल्पना शिक्षणक्षेत्रात आली.ही एक प्रकारची नैदानिक चाचणीच होती. ही चाचणी आकारिक मूल्यमापनाचेच साधन होते. अभ्यासक्रमातील एक घटक शिकवून झाला की लगेच पुढच्या एखाद्या तासाला घटक चाचणी घ्यायची.ही घटक चाचणी त्या घटकातील महत्वाच्या उपघटकांवर आणि संबोधांवर तयार केलेली असे.सर्वसामान्यपणे जे संबोध वर्गातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना समजले नसतील त्यांचे परत अध्यापन होणे अपेक्षित होते. मर्यादित अर्थाने हे'उपचारात्मक अध्यापन'असे. या घटक चाचण्यांमुळे मूल्यमापन प्रक्रिया अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा भाग बनत असे. मोठ्या प्रमाणावर वेगळ्या नैदानिक चाचण्या घेण्याची गरज नव्हती. एखाद्या विषयाला वर्षभरात एकूण सुमारे ९० तासिका असतील आणि त्या विषयात मुख्य १० घटक असतील तर प्रत्येक घटकाला सरासरी ८० तासिका अध्यापनासाठी; तर १० तासिका घटक चाचण्यांना उपलब्ध होतात.परंतु घटक चाचण्यांची संख्या फार होते असे म्हणत त्यांची संख्या कमी करत शेवटी सत्रातून एखादी,एवढी ती संख्या कमी झाली.चाचणीच्या नावातील 'घटक'या शब्दाचा चाचणीतील आशयाशी संबंध उरला नाही.बरे घटकचाचण्याही विविध प्रकारे घेता येतात.परंतु परीक्षा,चाचण्या म्हणजे भीती,म्हणजे अध्ययन-अध्यापनातील अडथळे असे मानल्याने या चाचण्या सोप्या (कार्यवाहीसाठी)आणि संख्येने कमी होत गेल्या. आता नैदानिक चाचण्या येऊ घातल्या आहेत.त्यांचीही येत्या काळात ही गत न होवो हीच इच्छा!

प्रा. विवेक पोंक्षे

# मौखिक परीक्षांद्वारे मूल्यमापन

आत्मसात केलेल्या कौशल्यांच्या सहाय्याने व झालेल्या अभ्यासाच्या मदतीने पुढील अभ्यासासाठी दिशा ठरविणे हा मूल्यमापनाचा उद्देश आहे. या दृष्टीकोनातून मूल्यमापनाकडे पाहिले पाहिजे. नेहमीच्या मूल्यमापन पद्धतीचा कल लेखन अभिव्यक्तीकडे झुकलेला जाणवतो. प्रत्येक लौकिक यशामध्ये शेवटच्या टप्प्यात मुलाखत द्यावी लागते व मुलाखत तंत्रातही मौखिकरीत्या झालेले सादरीकरण अधिक महत्त्वाचे ठरते.

**उद्देश**

प्रत्येक विषयाचा अभ्यास हा आकलन, कौशल्य, स्मरण, उपयोजन, अभिव्यक्ती, भावनिर्मिती आणि नवनिर्मिती या टप्प्यांतून होत असतो. हे टप्पे स्वतंत्र असत नाहीत तथापि इंद्रधनुष्यातील रंगांप्रमाणे स्वतंत्रपणे दिसू शकतात. मूल्यमापन हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रभाव टाकणारा महत्त्वाचा घटक आहे.

मौखिक परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती उत्तम प्रकारे विकसित होते. किंबहुना असा अभिव्यक्ती विकास व्यक्तिमत्त्व विकासाला उपयोगी ठरतो आहे. एक साधन म्हणून मौखिक परीक्षा व्यक्तिविकासासाठी उपयोगी  आहेत. निगडी येथील ‘गुरुकुल’ या पंचकोश विकसनावर आधारित शिक्षणात तमौखिक परीक्षेचा  प्रयोग नियमित चालू आहे.

**परीक्षक**

त्या त्या विषयाच्या जाणकार व्यक्तींकडून मौखिक परीक्षांद्वारे  मूल्यमापन करून घेता येते. त्या विषयात कार्यरत असणारे, प्रयोगशील, व्यासंगी असे अध्यापक वा अन्य ठिकाणी कार्यरत असणाऱ्या व्यक्तीही परीक्षक म्हणून निवडता येतात. परीक्षकाकडे त्या विषयाचा व्यासंग, ज्ञान व नवीन काही सुचविण्याची, त्यात भर टाकण्याची क्षमता असावी. प्रश्न विचारण्याचे कौशल्य,विद्यार्थ्याला काय येत नाही.  यापेक्षा काय येते आहे हे विद्यार्थ्याकडून सहजगत्या काढून घेता यायला हवे. प्रश्नांचे उत्तर आले नाही तर विद्यार्थ्यांना ते सांगून पुढे मार्गदर्शन करता यायला हवे. अध्यापकांची, विद्यार्थ्यांची व अभ्यासक्रमाची खोली कशी वाढविता येईल? आणखी कुठल्या अंगाने विचार करता येईल? यावर विद्यार्थी व अध्यापकांशी चर्चा व्हायला हवी. आजूबाजूला बघितले तर समाजात अशा अनेक व्यक्ती सापडतील यात शंका नाही.

**पद्धती**

साधारणतः वर्षातून दोन वेळा प्रत्येक विषयाचे मूल्यमापन मौखिक परीक्षांद्वारे करून घेणे गरजेचे ठरते. पहिल्या सत्राच्या शेवटी किमान काय झाले व अजून काय व्हायला हवे हे समजते व वर्षअखेरीपर्यंत त्यातले काय व किती प्रमाणात विद्यार्थ्यांनी अवगत केले हे समजते.

जास्त विद्यार्थीसंख्या असेल तर विद्यार्थ्यांचे गट करावेत. साधारणतः पाच विद्यार्थी एका गटात ठेवता येतात. एका गटाची परीक्षा अर्ध्या तासात होऊ शकते. वस्तुनिष्ठ प्रश्न न विचारता बहुआयामी प्रश्न विचारावेत. त्यामुळे अनेक जणांना त्यावर बोलता येते. स्वत:ची कल्पकता, संभाषणचातुर्य,अभिव्यक्ती दाखवता येते. प्रश्न विचारण्याची खुबी, हातोटी यावर ते अवलंबून असते. विद्यार्थ्यांना परीक्षा झाली, हे कळता कामा नये. इतक्या सहजतेने ही परीक्षा घेणारे परीक्षकही असतात.

नमुना म्हणून काही विषयांचे निरीक्षणतक्ते सोबत दिलेले आहेत. समोर विद्यार्थ्यांची यादी असेल तर ज्या क्रमाने विद्यार्थ्यांचे गट परीक्षेला येतील त्या क्रमाने ती लिहिलेली असावी.

विषयशिक्षकाने अंतर्गत परीक्षकाचे काम करावे. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त बोलण्यास प्रेरित करावे. एखाद्या विद्यार्थ्यात विशेष गुण आढळल्यास तशी नोंद निरीक्षण तक्त्यात करावी.

शक्यतो परीक्षकांनी परीक्षा आटोपल्यावर सर्वांपुढे काय करता येण्यासारखे आहे यावर मार्गदर्शन करावे. अध्यापकांबरोबरच्या चर्चेत त्या त्या विषयातील काही नवीन उपक्रम सुचविता येतील. अध्यापकांना विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासाबाबतची निरीक्षणे परीक्षकांनी सांगावीत.

**परिणाम**

गेल्या अनेक  वर्षांत, वर्षातून दोन वेळा प्रत्येक विषयाच्या मौखिक परीक्षेची सवय, तशा अभ्यासाचा अनुभव विद्यार्थी व अध्यापकांना येत गेला. त्यामुळे त्यात असलेले अधिकाधिक नावीन्य, भेटलेले अनेक विषयांचे अनेक परीक्षक, यामुळे प्रश्नांचे प्रकार, अध्ययनाची व अध्यापनाची खोली वाढू शकली.

**विषय- मराठी** **इ. ७ वी** **गुण -५०**

| गुण | १० | १० | १० | १० | १० |
|---|---|---|---|---|---|
| अध्ययन टप्पा | स्मरण | आकलन | उपयोजन अभिव्यक्ती | आकलन स्मरण | उपयोजन, भावनिर्मिती, |
| प्रश्न प्रकार | ♦ पाठांतर<br>♦ पाठ्य पुस्तकातील कविता<br>♦ उतारे / स्वगते<br>♦ अभंग<br>♦ पद्य इ. | ♦ अवांतर वाचन<br>♦ पुस्तक परिचय<br>♦ पुस्तक संख्या ?<br>♦ काय आवडेल ?<br>♦ सहली बद्दल प्रवास वर्णन<br>♦ एखाद्या मुलाखतीतून किंवा व्याख्यानातून काय आवडेल ?<br>♦ पाठ्यक्रमातील काय समजले? याबद्दल प्रश्न विचारावेत. | ♦ एखाद्या विषय देऊन त्यावर संवाद साधण्यास सांगणे .<br>♦ एखाद्या पाठाचे नाट्यीकरण करावयास सांगणे.<br>♦ प्रकट वाचन चढ-उतारासह एखाद्या खास शैलीत वाचन करता येते का? हे पाहणे. | ♦ एखादा भाग वाचायला सांगून बाकीच्या विद्यार्थ्यांनी श्रवण करणे व श्रवणातून प्रश्न विचारणे किंवा ध्वनीफित ऐकायला सांगणे त्यावर प्रश्न विचारणे.<br>♦ बहुश्रुतता (त्याने पूर्वी ऐकलेल्या व्याख्याने किंवा अन्य भाषणाचे कथन करावयास सांगणे) | ♦ नवनिर्मिती एक वाक्य देऊन त्याला समानार्थी त्या अर्थाची अनेक वाक्ये बनविता येणे.<br>♦ आयत्यावेळी विषय देऊन त्यावर बोलण्यास सांगणे. (उस्फुर्त वकृत्व)<br>♦ एखाद्या गोष्टीची सुरुवात करून देऊन सर्वांनी मिळून क्रमाने पूर्ण करणे.<br>♦ एखाद्या पात्राशी तादात्म्य पावता येणे.<br>♦ स्वत:च पात्र बोलते असा विषय देणे. |
| वैशिष्ट्ये | आत्मविश्वास | स्वयंअध्ययन वृत्ती | आत्मविश्वास<br>आत्मप्रतिमा<br>कार्यपद्धती | संस्कारक्षमता | समस्या विमोचन<br>आत्मविश्वास |

**विषय– गणित** **इ.५ वी** **गुण -५०**

| गुण | १० | १० | १० | १० | १० |
|---|---|---|---|---|---|
| प्रश्न प्रकार | ♦ गणिताचा व्यावहारिक उपयोग (अंकगणित,बीज गणित व भौमितिक रचनांचा उपयोग)<br>♦ एखाद्या खोलीची किंवा वस्तूंची परिमिती काढता येणे.<br>♦ क्षेत्रफळ काढता येणे.<br>♦ घनफळ काढता येणे.<br>♦ मापन अचूकता व अंदाज बांधता येणे.<br>♦ मोजपात्रात पाणी मोजता येणे. | ♦ गणितातील पाठांतर - सूत्रे,नियम<br>♦ २ ते ३० पाढे | ♦ परिमाणे- कि.ग्रॅ.,ग्रॅम,लिटर, मीटर,से.मी. इत्यादींचे रूपांतर करता येणे | ♦ पाठ्यक्रमातील संख्या वाचन करता येणे.<br>♦ वेळ,वेग,अंतर सरळव्याज काढता येणे<br>♦ कालमापन व नफा -तोटा यांचे आकलन होणे.<br>♦ तोंडी गणिते सोडविणे.<br>♦ दशांश अपूर्णांक वाचता येणे. | ♦ बौद्धिक गणिते<br>♦ शाब्दिक व तार्किक कोडी<br>♦ आकृत्या काढणे<br>♦ भौमितिक रचना ओळखता येणे<br>♦ पाव,अर्धा, पाउण,सव्वा, दीड यांच्यातील रूपांतर व गुणोत्तर लक्षात येणे.<br>♦ उदाहरण तयार करता येणे. |
| आकलन टप्पा | उपयोजन कौशल्य | स्मरण | उपयोजन ,आकलन | आकलन | नवनिर्मिती |
| वैशिष्ट्ये | कार्यपद्धती | कार्यपद्धती | स्वयंअध्ययन वृत्ती | समस्या विमोचन | सर्जनशीलता |

**विद्यार्थ्यांमध्ये पुढील बदल जाणवले –**

१) अध्ययनपद्धतीत भर पडली.

२) पाठांतर वाढले.

३) मौखिक अभिव्यक्ती वाढली.

४) गटश: चर्चा करण्याची सवय झाली.

५) काही अंशी मुलाखत तंत्र आत्मसात होण्यास मदत झाली.

६) कल्पनाशक्ती, चटकन उत्तर देण्याची सवय वाढली.

७) जिज्ञासा वाढण्यास वाव मिळाला.

८) आत्मविश्वास वाढल्याचे जाणवले.

९) वक्तृत्व, संभाषणकौशल्य, बहुश्रुतता वाढण्यास मदत झाली.

१०) वेगवेगळया परीक्षांमुळे अनोळखी व्यक्तींच्या अनोळखी प्रश्नांची उत्तरे देण्याची सवय झाली.

११) मौखिक परीक्षेत समावेश असतो म्हणून विविध भेटी व मुलाखती यांच्या नोंदी, अवांतर वाचन, पुस्तक-लेखन,विशेष लेख यांच्या नोंदी, कात्रणे, टिपणे यांचे संकलन करण्याची सवय लागली.

१२) अनेक व्यक्तींचे मार्गदर्शन मिळाल्याने बहुश्रुतता वाढल्याचे जाणवले.

लेखन अभिव्यक्तीप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिविकसनात मौखिक परीक्षेमुळे वाढ होण्यास मदत होते. तथापि वेगवेगळया विषयांनुसार व इयत्तांनुसार त्यात अधिक भर घालून परिणामकारकता वाढविता येणे शक्य आहे.

**सार्वत्रिक होणे शक्य आहे?**

हा प्रश्न ज्याचा त्याचाच आहे. तथापि व्यक्तिविकसनाच्या या प्रक्रियेत याचा निश्चित उपयोग होईल यात शंका नाही. पण परिस्थितीनुसार नवीन भर घालत जावी लागेल. अन्यथा पद्धतीत यांत्रिकता येण्याचीही शक्यता असते. आज आकारिक मूल्यमापनासाठी मौखिक परिक्षा हे प्रभावी व परिणामकारक साधन आहे.

**-प्रा.संजय पायगुडे, गुरुकुल**

**ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**


**(प्रशिक्षक, वर्ष ४ अंक ४ मधून पुनर्मुद्रित )**

# Does accelerated learning work? For which students?

Identifying the needs of the **gifted,** Jnana Prabodhini Prashala – a school, has been running a differentiated & challenging curriculum for identified **gifted** for the purpose "Enhancing leadership qualities of Intelligent for social change", since 1969. Though the school finds its curriculum effective, to make it efficient by orienting it more learner centred, a program in Mathematics and English was launched. The program based on the principles of **Accelerated & Mastery Learning** amalgamated, allows a student to learn with his/her own pace of learning. The program does not restrict a student to the same class till the specified time period is over but is promoted to the next class as soon as, but only after he/she has mastered the content at a particular level. The students in the classes formed in this new system are homogeneous in the level of content mastered in the respective subject and not in age and physical maturity. The statistics shows that about 28% of the students save six months time in Mathematics and 41% of the students save a year in English than any normal system in mastering the expected content. **Enrichment activities** are conducted after students reach at the highest level class. High-achievers lie superior in achievement motivation than the Low-achievers.

- Dr. Milind Naik

पूर्ण शोध निबंध वाचण्यासाठी http://www.erc-pune.org/en/resources/does-accelerated-learning-work-for-which-students वर क्लिक करा



# ग्रंथालयाचा वापर वाढविण्यासाठी




- निरनिराळ्या गोष्टी व कविता सकाळच्या प्रार्थना सत्रात किंवा समारंभाच्या वेळेस वाचण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करणे, ज्यामुळे त्यांचा ग्रंथालयातील वावर वाढेल.
- मुलांना वेगवेगळी पुस्तके चाळण्यासाठी व वाचण्यासाठी प्रोत्साहित करावे. त्यासाठी पुरेसा वेळ त्यांना उपलब्ध करून द्यावा. त्यामुळे त्यांना वेगळ्याच जगाची ओळख होईल.
- ग्रंथालयातील पुस्तकांवर शिक्के मारण्यासाठी, वेगवेगळी कार्डे तयार करण्यासाठी मुलांचीच मदत घ्यावी. ग्रंथालयातील स्वच्छता मुलांकडून करून घ्यावी. ग्रंथालयाच्या रचना वा सजावटीबद्दल त्यांच्या कल्पनांना वाव द्यावा.
- मुलांना पुस्तकांसाठी आकर्षक वेष्टणे घालायला सांगावीत. त्यावर वेगवेगळ्या सूचना अथवा माहिती लिहायला सांगावी.
- मुलांना त्यांच्या आवडत्या लेखकाच्या पुस्तकाबद्दल पत्राने प्रतिसाद कळविण्यास सांगावे. कधी कधी लेखक प्रत्युत्तरादाखल पुस्तकही पाठवतात.त्यामुळे मुले पुस्तकांच्या प्रेमात पडू शकतील.
- मुलांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचावीत  यासाठी त्यावर आधारित चित्रपट दाखवून त्यांना प्रोत्साहन द्यावे किंवा पुस्तकातील काही प्रकरणे वाचून दाखवावीत व पुढील प्रकरणे पुढील आठवड्यात वाचून दाखवल्यास उत्सुकतेपोटी मुले स्वत:च पुस्तक वाचतील.
- मुलांना एखादे मासिक गटाने तयार करायला लावावे व ते त्यांच्या आनंदासाठी ग्रंथालयात मांडावे.
- ग्रंथालयात 'खजिन्याचा शोध'हा खेळ देखील घेता येईल. ग्रंथपालाने खजिन्याच्या शोधासाठी वेगवेगळ्या पुस्तकांत,ग्रंथात 'क्लू' ठेवावेत. मुलांनी ते शोधावेत. पुढे मुलांनी हा खेळ गटागटात खेळावा.



- वेगवेगळ्या विषयांवर मुलांना तयारी करून आपले भाषण सादर करायला लावणे.
- शाळेत 'पुस्तक फलक' चालवता येईल यावर पुस्तकांविषयी माहिती लिहिलेली असेल.
- मुलांना पुस्तकांचा परिचय लिहायला सांगणे .
- आवडीच्या पुस्तकांतील व्यक्तिरेखांची चित्रे  काढायला लावणे.

- ‘Book of the week’, ‘A book of a particular student’s choice.’ या सारखे कार्यक्रम ठरवता येतील.
- विद्यार्थ्यांना  घरामधील सदस्यांसमोर पुस्तक वाचण्यासाठी म्हणून पाठवता येईल.
- पुस्तक विकत घेण्यासाठी मुलांना ग्रंथ प्रदर्शनामध्ये बरोबर घेऊन जाता येईल.
- सर्व वयोगटातील मुलांसाठी कथाकथन करता येईल किंवा पुस्तकवाचन करता येईल.
- मुलांना एखादी कथा निवडून, त्या कथेवर आधारित नाट्य सादर करण्यास सांगता येईल.
- ‘वाचकवीर व्हा’ अशी स्पर्धा आयोजित करून यामधे मुलांना वाचण्यासाठी ठराविक  पानांचे उद्दिष्ट देता येईल.
- लेखकांना व वाचकवीरांना मुलांशी बोलण्यासाठी मधून-मधून बोलवता येईल.
- पुस्तकाच्या सुरुवातीला पुस्तकाविषयी माहिती सांगणारे कार्ड पुस्तकात ठेवता येईल. असे उपक्रम करून पाहावेत आणि तुम्हाला सुचलेल्या नवीन उपक्रमाविषयी आमच्या पत्यावर जरूर कळवावे.




# पुस्तक परिचय



मासिक
शिक्षणातील आनंदासाठी..
जडण-घडण
(विद्यार्थी, शिक्षक, पालकांचे संयुक्त व्यासपीठ)
जिंकण्याच्या आनंदात सहभाग सर्वांचा
INDIA
START


साधना


छात्र प्रबोधन


चंपक
मराठी
Happy
new
YEAR


किशोर


पालकनीती
पालकत्वाला वाहिलेले मासिक


2015
स्वस्ताई आणि नवलाईचे नववर्ष
सेकंड होमसाठी पुणे-नाशिककडे धाव!
गव्हर्नन्स नाऊ
शासन... प्रशासन... सुशासन!
सिमेंट कंपन्यांकडून लुबाडणूक

# सुट्टीतील शिबिरे



## सुट्टीतील शिबिरे

### विज्ञान शिबिर

दिनांक : २० ते २२ एप्रिल २०१५
वयोगट : ५ वी ते ८ वी
वेळ : स. १० ते २
शिबीर शुल्क : रु. ७००/-

### स्वयंअध्ययन कौशल्य

दिनांक : ६ ते १० मे २०१५
वयोगट : ८ वी ते ९ वी
वेळ : स. १० ते २
शिबीर शुल्क : रु. १०००/-

### चला कल्पक बनूया

दिनांक : २४ ते २८ एप्रिल २०१५
वयोगट : ६ वी ते ८ वी
वेळ : स. १० ते २
शिबीर शुल्क : रु. १०००/-

### फिल्म मेकिंग

दिनांक : २ मे ते ११ मे २०१५
वयोगट : ७ वी ते ९ वी
वेळ : स. १० ते २
शिबीर शुल्क : रु. ३०००/-

ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम व संशोधन केंद्राच्या 'बुद्धिमत्ता संवर्धन केंद्रातून' वर्षभर विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक कार्यक्रम राबविले जातात. प्रतिवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत एप्रिल/मे महिन्यात विविध शिबिरांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या कल्पक, जिज्ञासा वृत्तीला वाव देणे, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लावणे, विविध कौशल्ये, कला यांचा उपयोग दैनंदिन जीवनात कसा करायचा याचा परिचय या शिबिरांतून केला जातो.

या शिबिरात आपला सहभाग आजच निश्चित करा!
नाव नोंदणी : १५ एप्रिल २०१५ पर्यंत, मर्यादित जागा!

---

**ज्ञान प्रबोधिनी, शैक्षणिक उपक्रम व संशोधन केंद्र**
५१४, सदाशिव पेठ, पुणे-३०

* दूरभाष क्र. (०२०) २४२०७१९४/९६
* संपर्क व्यक्ती : गीता साठ्ये (९८२२६६०६८३)
  प्रकाश रणनवरे (९८२३१५३९४८)

---

**Website Links**

http://www.balbharati.in/kishor.html

www.chhatraprabodhan.org

palakneeti.org

www.onlinemagazineshub.net/champak.html

www.marathimati.com/balmitra/stories/stories.asp--

http://www.weeklysadhana.com


## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : ‘विनायक भवन’, ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४

ई - मेल : erc@jnanaprabodhini.org

Visit us at : **www.erc-pune.org**